**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २१ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्वत्र योगसाधना कार्यक्रमांचं आयोजन,योग साधनेनं विश्वाला जोडल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन.
2. राज्यासह विदर्भात योग दिनाचा उत्साह, नागपूरच्या कार्यक्रम केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सहभागी.
3. 'स्वप्ननिकेतन' सदनिकांसह विविध विकास कामांचे उद्या नागपुरात लोकार्पण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार उद्घाटन.
4. २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या वर्षीच्या तुलनेत ४ पूर्णांक ८६ शतांश टक्के वाढ.
5. स्वयं सहायता गटातर्फे जलपर्णीपासून वस्तूंच्या उत्पादनास सुरूवात, नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाचा स्तुत्य उपक्रम.

----------------------------------------

**आंतरराष्ट्रीय योग दिन-राष्ट्रीय**

**११वा आंतरराष्ट्रीय योग दिन आज सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त उत्तराखंडमध्ये डेहराडूनमध्ये झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहभागी झाल्या होत्या. योग ही निरोगी जीवन जगण्याची कला आहे, हा केवळ व्यायामाचा प्रकार नाही तर संतुलित जीवनशैलीचा आधार आहे असं त्या यावेळी म्हणाल्या. जागतिक समुदायात योग साधनेबद्दलचा आदर वाढला असल्याचंही त्यांनी यावेळी नमूद केलं. योग साधनेनं आज संपूर्ण विश्वाला जोडलं आहे हे बघणं अत्यंत सुखद आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विशाखापट्टणम मध्ये आज ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.....**

***(होल्ड बाइट- पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

*ये देखना सुखद है कि कैसे योग ने पूरे विश्व को जोड़ा है। दुनियाभर में करोड़ों लोगों की जीवन शैली का हिस्सा बन चुका है। चाहे सीढ़ी ओपेरा हाउस की सीढ़ियां हो, या एवरेस्ट की चोटी हो, या फिर समंदर का विस्तार हो, हर जगह से एक ही संदेश आता है, योग सभी का है और सभी के लिए है।*

आयुष मंत्रालयाच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात ३ लाख योगसाधक सहभागी झाले होते.

----------------------------------------

योग दिन-मुख्यमंत्री

योगदिनानिमित्त मुंबईत राजभवन इंथ आयोजित योगसत्रात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सहभाग घेतला. सर्व विद्यापीठांमध्ये योगाभ्यास सुरू करण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. पंढरपूरची आषाढी वारी सुरु असतानाच आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होत आहे. पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकरी भक्तीयोग कार्यक्रमात वारकऱ्यांसोबत योग साधना केली. मंत्री चंद्रकांत पाटील आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ हे देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

*(होल्ड- मुख्यमंत्री 28 सेकंद)*

*जागतिक योग दिनाच्या सर्वांना मी खूप शुभेच्छा देतो. योगविद्या जी आपली प्राचीन संस्कृती आहे, जी आपली जीवन पद्धती आहे ती योगविद्या योग आणि आसन ही जगभरात पोहोचवण्याचं काम माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींनी केलं आणि आज जगाच्या सर्व देशांमध्ये योग दिवसाच्या निमित्ताने योगासानाचं काम किंवा योगासन करण्याचं प्रयत्न त्या-त्या ठिकाणचे लोक करत आहेत.*

----------------------------------------

योग दिवस-नितीन गडकरी

नियमित योगासनामुळे शरीर आणि मनाचे स्वास्थ्य उत्तम राहते, अनेक आजारांना दूर ठेवता येतात याबाबत जनजागृती करणारे 'करा हो नियमित योगासन' हे गीत म्हणत आज सकाळी हजारो योगसाधकांनी योगाची प्रात्यक्षिके सादर केली. निमित्त होते ते नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक योग दिनाचे. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेवर आधारित मनपाचा जागतिक योग दिन कार्यक्रम यशवंत स्टेडीयमवर शनिवारी पार पडला. यंदाच्या

दशकपूर्ती सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आमदार प्रवीण दटके, पोलीस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल, महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जनार्दन योगाभ्यासी मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ खांडवे व हजारोंच्या संख्येत नागरिक उपस्थित होते. सामूहिक योग प्रात्यक्षिक कार्यक्रमाला नागपूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागपूर शहर नशा मुक्त करण्याकरिता नागपूर पोलिसांकडून राबविण्यात येणाऱ्या 'मिशन थंडर' अंतर्गत उपस्थितांना नशा मुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली. पोलीस निरीक्षक अनामिका मिर्जापुरे यांनी प्रतिज्ञा दिली या वेळी दैनंदिन जीवनात योग महत्वाचा असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रतिनिधीं माध्यमांशी बोलताना म्हणाले -

*(होल्ड बाइट- नितीन गडकरी 32 सेकंद)*
*हमारे स्वास्थ्य के लिए नियमित रूप से योगासन करना इसका बहुत बड़ा उपयोग हमारे जीवन में होता है। हमारा स्वास्थ्य अच्छा रहे इसलिए योग विज्ञान हमारे लिए बहुत उपयोगी है। मुझे इस बात की खुशी है कि आदरणीय प्रधानमंत्री जी ने यूनो में आज का दिन योगदिन करके ज़ाहिर करने के लिए अनुरोध किया था। आज पूरे विश्व में अनेक देशों में बड़े प्रमाण पर आज योग का प्रसार हुआ है, और लोग योगासन कर रहे हैं। ये हमारे लिए बहुत बड़ी उपलब्धि और अभिमान का विषय है।*
जागतिक योग दिनाच्या आठवणींना उजाळा देत रामभाऊ खांडवे यांनी दैनंदिन जीवनातील नियमित योगाभ्यासाचे महत्त्व सांगितले. नियमितपणे योग करण्याचे महत्व त्यांनी विषद केले. तसेच नागपुरात जनार्दन स्वामी यांच्या नेतृत्वात पहिल्यांदा योग दिन साजरा करण्याची संकल्पना मांडण्यात आली होती, अशी आठवणही त्यांनी यावेळी सांगितली. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज सकाळी ६:०० वाजता ग्रुप सेंटर सीआरपीएफ नागपूर कॅम्पसमध्ये योगासने सुरू करण्यात आली ज्यामध्ये सीआरपीएफ अधिकारी आणि जवानांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. योग प्रशिक्षकांच्या देखरेखीखाली सूर्यनमस्कार, प्राणायाम, कपालभाती, अनुलोम-विलोम, भ्रामरी, ताडासन, वृक्षासन आणि ध्यान यांचा सराव करण्यात आला. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर आणि जनार्दन स्वामी योगभ्यासी मंडळ, रामनगर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने "११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त" आज मुक्तांगण, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर येथे योग दिन साजरा करण्यात आला. केंद्राच्या संचालिका आस्था

कार्लेकर आणि जनार्दन स्वामी योगभ्यासी मंडळ, नागपूरचे योग प्रशिक्षक सोपान अवचार यांनी दीपप्रज्वलन करून योग सत्राची सुरुवात केली.

-----------------------------------------

‘स्वप्न निकेतन’

नागपूर महानगरपालिकेतर्फे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत वांजरा येथे बांधलेल्या ‘स्वप्न निकेतन’ सदनिकांचे हस्तांतरण तसेच विविध विकास कामांच्या लोकार्पण कार्यक्रमाचे रविवार २२ जून रोजी सायंकाळी ५ वाजता कामठी रोड येथील वांजरा पिवळी नदी येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सदनिकांच्या लाभार्थींना प्राथमिक स्वरुपात किल्ली दिली जाईल. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत वांजरा भागात ४८० सदनिका बांधण्यात आल्या आहेत. या सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील नागरिकांसाठी बाधण्यात आलेल्या आहेत. सदनिका हस्तांतरणाचा कार्यक्रमात राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे महसूल मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे अर्थ व नियोजन, मदत पुनर्वसन, विधि व न्याय तसेच कामगार राज्यमंत्री आशीष जयस्वाल उपस्थित राहणार आहेत. यासोबतच मनपाच्या पाचपावली अग्निशमन केंद्र, ओमकारनगरातील स्मार्ट टॉयलेट, हॉट मिक्स प्लांटमधील नवीन मशिनरीचे त्याचप्रमाणे कळमना येथील जलतरण तलाव, २७ आयुष्यमान आरोग्य मंदिर, ट्री ट्रांसप्लांट करण्यासाठी घेतलेल्या मशीनचे उद्घाटन, अग्निशमन फायर टेंडर्स, शहर बस सेवेसाठी मिळालेल्या ई-बससह अंबाझरी दहनघाटाकडे जाणाऱ्या पुलाचे लोकार्पण व विविध सौंदर्यीकरण व सुशोभीकरणाचे उद्घाटन केले जाणार आहे.

-----------------------------------------

प्रत्यक्ष कर संकलन

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १९ जूनपर्यंत देशाचं एकूण प्रत्यक्ष कर संकलन गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत ४ पूर्णांक ८६ शतांश टक्के वाढून सुमारे ५ लाख ४५ हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. मात्र एकूण प्रत्यक्ष कर संकलनात १ पूर्णांक ३९ शतांश टक्के किरकोळ घसरण नोंदवली गेली. ही घसरण प्रामुख्याने कर परताव्यात ५८ टक्के वाढ झाल्यामुळे आहे.

-----------------------------------------

हस्तशिल्प उत्पादन

**नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागातर्फे तलावातील जलपर्णी वनस्पतीचा वापर करून महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाद्वारे महिलांनी हस्तशिल्प उत्पादनास सुरूवात केली आहे. पहिल्या तुकडीच्या प्रशिक्षणार्थी महिलांचे** 45 **दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण झाले. प्रशिक्षण केंद्रातील महिलांनी विविध वस्तू तयार केल्या आहेत. यातून महिलांना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने मदत होत आहे.**

**-----------------------------------------**